अखंड हिन्दुस्थान प्रकाशन — पुष्प १ ले

R. S. DIXIT LIBRARY NAGPUR

# क्रान्तिमाला

(कविता संग्रह)

क-५००

राजा बढे:

★

R. S. DIXIT LIBRARY, NAGPUR.
Purchased on 24-7-56
Cl. No. क-५००
Accession no. 2354/195354

मुद्रक-प्रकाशक
पंडित वखले
अखंड हिन्दुस्थान प्रकाशन मर्यादित करतां
श्रमिक मुद्रणालय, विठ्ठलवाडी
रानडे मार्ग, दादर, मुंबई.२८

मूल्य १ रु.

"कृपा करुन पुस्तक काळजीपुर्वक वापरावे"



ॐ सावरकर सदन,
शिवाजी अुद्यान,
मुंबअी २८

श्री. राजाभाअू दढे यांसी,

महाशय,

आपण आपल्या 'क्रांतिमाला' या पुस्तकासाठीं मला प्रस्तावना लिहिण्याची अथवा आशिर्वाद देण्याची विनंती केली. पण अलिकडे मी प्रस्तावना आदि लिहिण्याचें बंद केलें आहे. कारण अेकतर प्रस्तावनेसाठीं अितकी विचारणा माझेकडे साहजिकपणेंच येत असते कीं मला त्या सर्वांना प्रस्तावना देणें अगदीं अशक्य होअून जातें.

दुसरें असें कीं आपण स्वतःच मराठी वाङमयांत अितके सुप्रतिष्ठित, नामवंत, नि प्रतिभासंपन्न कवी नि साहित्यिक आहांत कीं आपल्या काव्यास माझ्या प्रस्तावनेची आवश्यकता आहे असें मला वाटत नाहीं. कळावें लोभ असावा हे विनंति.

दि. ६।५।५२. मुंबअी

आपला,

वि. दा. सावरकर

---

मुखपृष्ठः— मुळगांवकर

D. S. DIXIT
LIBRARY
Sitabuldi, NAGPUR

"कृपा करुन पुस्तक काळजीपुर्वक वापरावे"

# विस्मृतींत गुंफलेली

# क्रां ति मा ला

विसरलों अम्ही ती सत्तावनची क्रांती
गेली न नीज ही ढळली अमुची शांती
तो धन्य धुरंधर अनन्य मंगल पांडे
स्वातंत्र्यसमरिं या प्रथम लढविले झेंडे
विसरलो चढविला फासावरती टोपे
मुर्दाड मनाला तया विसरणें सोपे
झुंजार पेशवा नाना विसरूं आज
झांशीची राणी रणीं तळपती वीज
कोसळे शिरावर अखंड संकट राशी
समशेर पाजळित निघे भवानी जैसी
" जबतक है दम में दम मै जंग लढूंगी
मै अपनी झांसी नहि दूंगी नहि दूंगी "
फेंकिला तटाहुनि फुरफुरता रणवारु
झुंजली निश्चयें, मरतां मरतां मारूं

★ ★ ★

सुंदरा मुंदरा केवळ तुझिया दासी
आगींतहि सोबत देति जीव जीवासी
भारतीय गगनीं चमकलीस तूं चपले
कोंडलें तेज ये अुफाळून जरि लपलें
घ्यावया सूड आगींत जाळली मैना
जाळल्या त्याच वन्हींत काजळी रैना
तो रंगोबापू सतत पाखडी प्राण
गोटांत शत्रुच्या जयें अुठविले रान
लखनौची बेगम, कुंवरसिंह बेभान
अरिवक्षावरती घालि वीर थैमान

★ ★ ★

विसरलो हुतात्मा क्रांतिवीर तो फडके
त्या रक्तस्मृतीचें पार अुडविले धुडके
ते लाल, बाल अन् पाल विसरलो नीट
चुकलेले सारे देशभक्त हे धीट
श्री अवधविहारी, चाकी, अमीर चंद्र
घेतला जयांनीं स्वातंत्र्याचा छंद
सत्येंद्र, कन्हाअी, सचिंद्र, बालमुकुंद
ते शामकृष्ण हरदयाल परमानंद
कान्हेरे, कर्वे, चाफेकर श्री कपले
पिंगळे, लोकविस्मृतींत सारे लपले
बारिंद्र, धिंगरा, रासबिहारी वीर
वीरेंद्र क्रांतिचे सळसळते हे तीर

०५-५००

विसरलो जाणुनी **खुदिरामची** फांशी
फाशीची वेदी हीच जयाची काशी
**से. बापट, राणा** क्रांतिदर्शिनी **कामा**
या अनेकांत तूं अेकच आत्मारामा
विसरलो **गदर** तें **कोमागाटामारु**
अपुल्याच घरीं ते ठरले चोर लुटारु

★ ★ ★

मंत्रिलें जयानें क्रांतीचें ब्रह्मास्त्र
सावरीत शस्त्रें जयें शिकविलें शास्त्र
कीं गजेंद्रशुंडेनेच जया अुपटावें
अरविंद क्रांतिचें मनांमनांत फुलावें
अन् **अभिनव भारत** अुठले घेउनि आण
वृध्द्याच घ्यावया करीं **सतीचें वाण**'
ना. दा.त घे **ग. दा वि. दा.** रण्यातें हातीं
दु:शाशन आसन डळमळलें आघातीं
'ने मजसि सागरा परत मातृभूमीला
रे भेटीसाठीं प्राण सख्या तळमळला'
ती ज्योत क्रांतिची तरंगली सिंधूंत
अन् किरणशलाका भरे बिंदुबिंदूंत
तें अंदमानचें होअी पावन क्षेत्र
आशेनें बघती जिकडे भारतनेत्र
अिहलोकीं अमृत आणियलें वीरांनी
किति अमर जहाले पिउनी **काळेपाणी**

'निर्वंश वंश' जो झाला देशाकरितां
विसरलो विनायक सायक तो लखलखता
त्या राजगुरू, सुखदेव भगतसिंगाला
विसरलो मुक्तिच्या रक्तलालसी .लीला
स्मृति मधुनी गेली बिस्मिलची काकोरी
हा चंद्रशेखरा मिळे न आता थोरी
विसरलो आज तो जलियाँवाला बाग
निद्रिस्त भारता जिनें आणिली जाग
विसरलो पार डायरचा अत्याचार
बिसरलो चिता त्या अबलांचा जोहार

★ ★ ★

बेचाळ पिढ्यांचा करावया अुध्दार
'जयहिंद' हिंदवी उठला जयजयकार
'आझाद हिंद' चे सेनानी रणधीर
जिकाया दिल्ली निघती हिरवे वीर
विसरलो तयांना स्वातंत्र्याच्या कालीं
तो रक्ततिलक लाविला जयांनीं भालीं
ज्यांचिया रक्तमासांत पायवा भरला
तो त्याग तयांचा स्मृतींतही ना अुरला
विसरलो सुभाषा - देश गौरवासाठीं
तो कृष्णदास लागला जयाच्यापाठीं
गगनांत आज जो चंद्र सुखें मिरवावा
ते तेज घेउनी करिति काजवे कावा

तो बाबू गेनू, कोतवाल, उरलेले
विसरलो अनामिक किती बळी गेलेले

★ ★ ★

ओविली ज्योत ज्योतींत जीव जरतारी
पदरास गुंफिली सूडाची चिनगारी
यौवनांत फुलल्या गुंफियले ग झेले
कोवळ्या रक्तरंगांत रंगले शेले
ग भारतमाते तुझी राखण्या लाज
चढविला तुला हा हौतात्म्यांचा साज
भ्रांतिची अुडविता राळ विसरले गेले
स्वातंत्र्य समर तें अमर जयांनीं केलें
ती ज्योत क्रांतिची काळावरती नाचे
कापल्या जिभा तरि कशी बोलशी वाचे
छळ क्रूर पाहुनी भिंती भिंती रडल्या
त्या लोह शृंखला तुरुंगांत वडबडल्या
'हा नसे जित पहा अबल न हा सेनानी
परि घात तयाचा केला हो स्वजनांनी'
श्री लेखराम राजपाल श्रध्दानंद
विसरलो आजही मुक्तीचा आनंद
विसरलो देश, अभिमान, विसरलों सारे
विसरलो वेश आपुली बायकापोरें
विसरलो अुरीं जी वाळगली अभिलाषा
विसरवी विभूती देशभक्तिची भाषा

विसरलो आणखी कलकत्याची दैना
दाबुनी कंठ मारिल्या बोलक्या मैना
ते अमृतसरचे निर्घृण कत्तलबाज
लाहोर कराची पार विसरलो आज
विसरलो दीन किंकाळया पडले घाले
कोवळया काळजांतही खुपसले भाले
मेघना रक्तवाहिनी कथी इतिहास
तें वारे,--विरले जयात सरते श्वास
संस्कृतीस्रोतसेविनी पावनी सिंधू
हिंदुत्व पोसले पिउनी अमृत बिंदू
ती अुदारचरिता सुरसरिता अमलांगी
विसरलो माय ही आम्ही भारतभंगी
भंगला वंग पांचाल भंगली दुर्गा
परधर्मरंजना अम्ही बांधला दर्गा
ठेविली घरावर अपुल्या तुळशीपत्रें
पोसिले निखारे अस्तनींत सुखमात्रें
विसरलो जिवाला जरी जाहला घाय
मानिला तोष परतले पांढरे पाय
विसरलों शौर्यही कसला मग प्रतिकार
प्रतिकार कराया नच आम्हा अधिकार
विसरतो यापुढें झाले पाकिस्थान
अन् डोळे मिटुनी देअूं हिंदुस्थान
केशरीं दूध पिउनिया वदे शापांनी
नुकतीच टाकिली कात पहा सापानी

लोळतो गुलाबावरी ओकितो गरळ
सोडी न लपेटा–होओील कैसा सरळ?
झाले ते भुललो जरी कापले नाक
जे होइल पुढती–करु या डोळे झाक
विसरलो स्वत्व संस्कृती आपुल्या मोला
आणखी काय विसरावे आता बोला
विसरुनि पुन्हां आम्हीच जरी अपराधी
तरी क्षमा मागतो अहो महात्मा आधीं

★ ★ ★

रे वीर अुतारा!–वळल्या जरि संक्रांती
क्रांतीविण होइल शांति : शांति : शांति
गेलें ते पौरुष आता अेक विनंती
ही अशीच लाभो शांति : शांति : शांती

★ ★

★

Kavita500

# खदखदा हासे विभूती अता

पूजाया परतंत्रते तुजसि गे चैतन्य गेले बळी
सूडानें जळती मनें तुडविली वेछूट पायातली
स्वातंत्र्योत्सुक चित्तवृत्ति चिरुनी मुंडावळी गुंफिल्या
कंठी झेलित रुंडमाळ खुडुनी क्रांतीकळ्या कोवळ्या ।।
सत्याची जरि राजरोस घडते हत्त्या निमित्याविण
होती मान्य जगांत जे उडविती नेत्रीं धुळीचे कण
चातुर्ये रचिल्या हिमालय चुका द्यायास तीलांजली
व्हाया भारत मुक्त, गुप्त कुहरीं हो राष्ट्र गंगाजळी ।।
सत्तेच्या सरणांत दीन दुबळा तो न्याय नीती दया
भूतांच्या दिवट्या भयाण भवतीं अंधार न्यायालया
मेले मानस धैर्य-तेज विझलें निष्ठाहि जीवन्मृत
गेली मानवता स्मशान बनलें वीरप्रसू भारत
गेले खाक जळून ध्येय, रचिता त्या पौरुषाच्या चिता
त्याची राखड फासुनी खदखदा हासे विभूती अता ।।

★

★ ★

# मंत्रज्ञ तो लाभला

दुर्गे! दुर्घट वारण्यास अपुली देशील शस्त्रायुधें ।
शापांचे शरचाप मेळ जुळुनि चैतन्य तें लाभु दे ।।

हिंदुराष्ट्र विमोचनार्थ स्फुरती द्वित्रिंश कोटी भुजा ।
ये रे ये अुभवूं फिरून भगव्या त्या दिव्य राष्ट्रध्वजा ।।

ज्योति जागविल्या असंख्य हृदयीं झाडोनिया काजळी ।
तेजे भ्रांत मनामनांत फुलता आशा प्रभा दाटली ।।

राजस्नेह विकास आजवरचा दीपावलीचा सण ।
होळी पेटविता अुडेल भडका त्या ज्योति मेळांतून ।।

येतां शस्त्र घरांत चालत घरीं स्वातंत्र्य येअी स्वयें ।
पूर्वीचेंच अजून छत्रपतिचें आहे महाराष्ट्र हें ।।

आला भारत पर्वकाल जवळीं तो भाग्यशाली क्षण ।
रे रे तक्षकरक्षका! अुलथुनि जाअील सिंहासन ।।

व्हाया दास्य विमुक्त आर्य अजिता ही मायभू मंगला ।।
क्रांतीचा स्फुरवीत मंत्र विजयी मंत्रज्ञ तो लाभला ।।

★

★ ★

# पहिला हार

खिस्ताब्द १९४० मध्यें स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या स्वागतसमयीं नागपूर स्थानकावर, 'सावधान' चे अुत्साही संपादक आणि सुप्रसिद्ध हिंदुसभा कार्य-कर्ते कै. मावकर हे 'वीर सावरकरांना पहिला हार माझा पडला पाहिजे.' या अिच्छेनें, अंबत्या गाडींत चढत असतांच पायफळीवरून पडून मृत्युमुखीं पडले ! ही दुर्दैवी घटना या कवितेची जन्मदाती आहे.

मृत्युचे पाश मावकरांच्या गळ्यांत पडले तरी त्यांनीं वीर सावरकरांना घालण्यासाठीं हातांत घेतलेला स्वागताचा हार त्यांच्या मुठींत तसाच होता!

– १ –

आज पहा येणार मानवन हिंदुंचा अधिपती
नगर लोटलें ओवाळाया नेत्रांची आरती
हरोहार दर्शना अुभी ती बाग फुलांची खरी
गुणीं गुंफिल्या रक्तकण्हेरी नवसुमनें साजिरी

तरुणांच्या ती क्रांतिमनांची प्रतिमूर्ति सोत्सुक
घेअि धांव भेटीस मिळाया मानाचें कौतुक
हा अुतावीळते! पुढे टाकिशी अुडीं
चुकली रे चुकली झेंपहि भरली घडी!!
कडकडा मोडिली दुबळी मानव कुडी
तुडवित येअी धरा धडधडा क्रूर कालनागिणी
मुठींत पहिला हार निखळला माळेमधला मणी

-२-

दम्य अुत्साहास जयाच्या गगनहि हो ठेंगणें
विहंगमातें कसें रुचावें भूवरती रांगणें!
कळिकाळाशीं खेळ खेळतां पडलें पाअुल पुढें
चढता वरती अतृप्ततेचे भयाण तुटले कडे
अगतिकतेनें आवेगाला असें कवळिता अुरीं
कालवेग चुरडीलच चुकता तोल क्षणाभीतरीं
मिटलें नच फिटलें डोळ्यांचें पारणें
ओठावर अडलें सिंहाचें गर्जणें
हातांत राहिलीं कार्याचीं कंकणें
स्वार्थ जाळुनी कृतार्थ ठरलें तें जळतें जीवन
हांसत सुटला अभिमानानें देहाचा कणकण

– ३ –

अमर फुलांचा प्राणहार तो पूजुनि वीराग्रणी
ने रे काला! निर्माल्याची माळ सुखें ओढुनी
कुणा न लवली मान, न झुकला निष्ठेचाही कणा
हारविले तुज हसत साहुनी प्राणांतिक वेदना
हार लपेटुनि हातावरती घातवार झेलिले
ढाल फोडिली तरवारीचें म्यानहि तें मोडिलें
प्राणसमर्पण करुनी केला वीराचा गौरव
अश्रुफुलांनीं सुहृदांच्या तें नटलें निद्रित शव
तो ध्यास सारखा अेकच ती धडपड
चढलास कडेही तुटलेले अवघड
रे अजुनि राहिला कोंडाण्याचा गड
काय घेतला पाय काढता तोडुनिया बंधन
तोरण तुटलें जवळ पातला स्वातंत्र्याचा क्षण

– ४ –

दिसून येअी अभंग गुण तो मधेच तुटता मणी
हिंद देवते! कधीं न राहिल तुझि ही माला सुनी
'सावध व्हा सावधान' सारे काल जरी कोपला
चेतविणारा वन्हि न विझला राहिल तो चेतला

★

★ ★

# घडूं दे पुन्हां एकदां भारत

मराठ्यांचिया मूर्त स्फूर्तीविकासा नवोन्मेषशाली कवींच्या कवे !
महासाहसी त्यागवीरा उदारा किती आळवावे तुला गौरवें ॥

तुझी लेखणी देत चेतावणी दास्यसंहारणीं धर्मसंवर्धनीं
ओजास्विनी धीरगंभीर वाणी यशोवर्त्मिनी ध्वांतविद्राविणी
करि दग्ध संदिग्दता बुद्धि मुग्धा विदग्धांतली रम्य ज्योतिष्मती
रिघे कल्पना वैनतेयापरि ज्ञेय अज्ञेय लंघून ध्येयाप्रती ॥१॥

सद्भावना हास्यलास्यातुनी वाहते वीर वक्तृत्व मंदाकिनी
तरंगांतरंगात संगीतवीणा जणूं रंगली शारदावादनीं
सह्याद्रिचा सिंह तो गर्जतांना थरारें मनी धैर्यमेरु महा
भरे कांपरे शांतीच्या भ्रांतिदुर्गा नव्या क्रांतिचा लोळ येताच हा ॥२॥

जळे जीवहि घातकी कैतवाचा विपत्काल दे सारखे हुंदके
उभी आसवें लोचनीं वंचकांच्या अहंकार विद्वेष होती फिके
विरोधास अंधत्व हे प्रेमभावें असूया हसे साहसा भाळुनी
तुझ्या पौरुषाची करायास पूजा पहा पातल्या आपदा लाजुनीं ॥३॥

तुला बंदिशाला न ती, काव्यमंदिर, जोपासिली तूं छलानें कला
शृंगारिल्या उंच भींती सुलेखें नि काळोख तेजोवलें जाळला
विक्राळ काळासवें खेळुनी गुंफिले गोफ तूं काळगुंफेतुनी
झुले अंदमानांतला राजबंदी सुहृद्भावहिंदोल आंदोलुनी ॥४॥

तुझ्या देशसेवेतुनीं दिव्य आदेश अन्–वेदनेतून संवेदना
जगोनी मरावे, मरोनी जगावें जगीं जाग रे जाग हिंदू मना !
स्वातंत्र्यमंत्रप्रभावें भरावी मनें वेत्रि चैतन्य संजीवनी
दिसे मूर्च्छनेतील, माधूर्य आभास, मृत्यूतही भासते मोहनी ॥५॥

स्वातंत्र्य शाहीर तू वीर झुन्जार गाता तुझी स्फूर्तिगीतें जरी
तोडावया दास्यबंधा कबंधा रणावेश येई मुरारापरी
मेली मनें नाचती प्राणज्योती स्फुरे, स्नेहभावें तुटे आतडी
जरी मोडिली ही कुडी मुंड घ्याया अुडी टाकिती हे मराठे गडी ॥६॥

हाडातुनी नाद ये हिंदु हिंदु हुतात्म्यांचिया चेतवीतां चिता
करा देहबंधातला बिंदु बिंदु सुखें सिंचुनी रक्तसिंधू रिता
पहा हालती सूड संदेश घ्याया सुमांच्या खुल्या पाकळ्या पाकळ्या
झंकारिती मंत्र तो तो कधींचा तुरुंगातल्या साखळ्या साखळ्या ॥७॥

विख्यात या वीर–भूमीवरी कीं मराठी मनांचा फुलावा मळा
फुलें कोवळीं वाहुनी यौवनाची करूं साजरा मृत्युचा सोहळा
अता फेंकरे वज्र तें मानवेन्द्रा खुल्या अिंद्रजालास या बालवी
कोषांतल्या सुप्त संन्यस्त खड्गा ! पुन्हा अेकदां नृत्य तें दाखवी ॥८॥

झुकावी पुढें मान अन् हार खावी, अशी मारखी चालली अुन्नती
पहा केवढा मान अन् हार कंठी, असें मानभावी जरी मानिती
पुरे द्यूत हे निंद्य गांधारनीती सुतासंगती अंध लीलारत
प्रतापें तुझ्या रे महाराष्ट्रभीमा ! घडू दे पुन्हां अेकदा भारत ॥९॥

--★--

# मुचकुंदाची झोंप

देवदानव युद्धांतील श्रमामुळ थकलेला सेना-पती मुचकुंद देवानें दिलेल्या वरानें कितीतरी युगें झोपलेला होता. सृष्टींत घडलेल्या घडा-मोडीची त्याला दादहि नव्हती. शेवटीं द्वापर युगांत कालयवनाला जाळतांना श्रीकृष्णाने मुचकुंदाच्या झोपमोडीचा चतुराअीनें अुपयोग करून घेतला. 'माझी झोप जो कोणी मोडील त्याच्याकडे मी पहातांच तो भस्म व्हावा ' असा मुचकुंदाने वर मागिला होता. या कथाभागावर हे रूपक आहे.

★

कुठें अेकदा दानवदमनीं गाजविता विक्रम
युगायुगांची घेशी निद्रा परिहराया श्रम
गिरिकुहरीं निर्जनघनतिमिरीं झाकुनि अंतःपट
कसा कळावा तुला जाहला सृष्टीचा पालट

वृक्षराजि वनलता खुरटल्या तसें मानवी जग
विवशतेंत ढासळले खाली अनंत अुन्नत नग
मैनांच्या मुरगाळित माना लपती शुक-कोकिळा
स्वातंत्र्याची गीतें विरली तिचा दाबिता गळा

निच्या अतृप्त आकांक्षांचे गगन वरी थाटले
तळमळत्या जीवांचे भवतीं मूकशाप दाटले
अहिंसामयी शीतल छाया पसरे विश्वावर
परक्यातें मोकळें टाकलें स्वैर लुटाया घर

चिरमृताला कुठे आपल्या स्वातंत्र्याची क्षिती
मनास मेल्या कशी असावी सामर्थ्याची स्मृति ?
अश्रूंनीं भिजल्या भूमीवर सुरम्य पिकले मळे
रक्ताच्या रणखतात यावी तशीच कांहीं फळे

नजराण्याला नृपा तुझ्या घे जित जिभलीचे कळे
थबथबली काळजे कोवळी, भरलेली मोहळे
लुटा राजदूतांनो नातर संपून जाअिल सुगी
पिळून घ्यावा जीव जोवरी असेल ती धुगधुगी

जगताच्या अधिराज्यतृषेने माजताच यादवी
भूगोलाचे रंग बदलते साम्राज्यें नवनवी
रक्तरंगि रंगली पश्चिमा पूर्वेवर ये छटा
रंग तिकडचा जिकडे वठवी, युद्धाचा बावटा,

नियतीची नवविलास नौका डुले रुधिर सागरी
आक्रंदन संगीत तरळते समीर लहरींवरी
पहा चालला अभिमानाचा मावळतीला रवी
रणपंची गातात मिळुनिया अखेरची भैरवी

कुठल्या संकेतानें कपटी चांद हासतो नभी
स्वार्थ हेतुनें अंधारातहि दिवटी सेना अभी
राजनिष्ठ भारता केवढी गडचा तुझी थोरवी
दुबळ्या जीवा ये ये व्हाया रणयागांतिल हवी

धांवण्यास धावशील फसता संकटांत तव प्रभू
आतुरतेनें जरी पाहते पराधीन मायभू
श्वासानें स्थापिली अुलथली साम्राज्यें भूपती
अमर समर तें तरी झोपला कां सुर सेनापती ?

मेली न अजुनी मनें, काळजी निशा जरी संचरे
मनामनाच्या निराश कुहरी जाळती टिणगी स्फुरे
निराशेंत या तीच तेवढी आशा हृदि नांदते
अूठ अूठ हे ! नव्यायुगाच्या विजयी सेनापते

अुघडताच तू कोपनेत्र ते काळयवन जाळला
बुद्धिसंभ्रमे अितिहासाचा विसर पडावा तुला
डिवचायाते शौर्य तुझें, ही लाथ घातकी पुरे
जाग झोपल्या पराक्रमा रे आशा अेकच अुरे

अुघडि नेत्र, ही मुचकुंदाची झोप सरूं दे अतां
दिग्विजयाचें दिसुं दे डोळा वैभव तें भारता !
जाळायाते दुष्ट अविन्धा कटाक्ष अेकच पुरे
पुढे व्हायचे मुक्तिमंगला दर्शन तव हांसरे

—★—

# दुरावलेले बुलबुल

( फुलांसाठीं बुलबुल जगतात व बुलबुलासाठीं फुलें फुलतात असा अेक संकेत आहे. राजद्वारीं बरेच बुलबुलांचे पिंजरे टांगलेले आहेत. त्या बुलबुलांनी आपला बाळपणीचा काळ जिथे घालविला, ती बाग कुठेतरी दूरवर भासमान होत आहे. बागेच्या दिशेकडे आतुरल्या नजरेनें पहात, तिकडील कांहीं हालचाल कळेल या आशेवरच ते जगत होते; व असा अेक सौभाग्यदिन अुगवला. त्यांना कुणीतरी सांगितलं कीं, आपल्या बागेंत वसंत फुलणार आहे. बहार येणार आहे. ही आनंददायक वार्ता अैकून पंजरस्थ जिवांची होणारी तळमळ व भारताला स्वातंत्र्य मिळूनही आपल्या मातृभूमीला व स्वातंत्र्य लाभाला मुकलेले निर्वासित व अितरत्र असणारे, तथाकथित राजकीय गुन्हेगार यांच्याही हृदयांची तळमळ -- ही सारखीच नव्हे काय ? )

बंदिस्त जिवांची किलबिल क्षण थांबली
वाहतो पवन कां असा चोर पावलीं?
होणार काय तरि आज अुपवनांतरीं
म्हणतात, येतसे बहार अपुल्या घरीं ॥

तो दूत फुलांचा आला मधुसौरभ
संदेश सांगतो सकलां सुखदुर्लभ
आतूर पाखरा अैक हृदय दाबुनी
येणार बहर रे अुद्या तुझ्या काननीं ॥

भिरभिरा पाहती बंदिवान पाखरें
ती शोभा, नयनीं रक्ताश्रूंचे झरे
मनहंस सारखा फडफड फडफड करीं
येणार बहर लाडका आपुल्या घरीं ॥
परतंत्र पाखरें पंजरांत कोंडलीं
बागेंत तयाच्या धूळधाण, चालली
रडवाया येई समीर दूतापरी
हासून सांगतो बहार आली घरीं ॥
बाहेर बहरली बाग, आग अंतरीं
धडकते हृदय ओततांच अश्रूसरी
तरुलता बहरल्या नटली ती वाटिका
जितजीवा शोकान्तिका नवी नाटिका ॥
बघ मिटून डोळे लुटलेलें वैभव
अन् घुमव सारखा दिगंत तो स्तुतिरव
"कीं बहार आली बहार आली नवी"
त्या साम्राज्यावर विझेल कैसा रवी? ॥
मोडशील कैसा चोचीनें ते गज
धरतात सुटाया का वेड्या सावज?
फटफडवि पंख तो पुन्हां उडाया वरी
आदळला खालीं हताश धडधड उरीं ॥
"कधिं पाहीन डोळा भरून माझें जग
स्वच्छंद भरारी घेउनि लंघिन नग"
ठायींच तळमळे हाय विचारा खग
अन् बहार आली तिथें—होय तगमग ॥

# गुलामास

कुठें ही जा गुलामा तूं नस जागा तुझ्यासाठी
सदाचा दैत्य टपलेला गिळायातें भित्यापाठीं
वळोनी तोंड दे त्यातें – उरीं त्या घाल थैमान
जरी पडलास लढताना स्वतःची मोडुनी मान

पुन्हां ये जन्म घेवोनी असा हैदोस घालाया
तिच्यासाठीं लढायातें उरीं ते घाव झेलाया
नको रे तोंड वेंगाडूं असे वेडया कुणापाशीं
पुन्हां जाशील गुंतोनी तयाच्या बांधल्या पाशीं

सुखानें ओढुंदे त्यातें गळयाला लाविली तात
तुटूं दे शीर खड्गीचा, न काढूं ठेविला हात
कधीं ना लाभलें कोणा सुखानें राज्य मागोनी
तुझ्या बाहूबलानें घे तुझें स्वातंत्र्य काढोनी

पहा रे ओढिती सारे मिळोनी केश मातेचे
झणीं घे धांव सोडाया नसे रे पाप हत्येचें
पुरा घे सूड देवीचा घुसोनी शत्रुच्या मेळीं
मुळीं पर्वा न देहाची जरी झालींत खांडोळीं

मरूं या मुक्ततेसाठीं, उडूं दे रक्त चिरकांडया
गदेचे घाव घालोनी अरींच्या फोडूं ये मांडया
कधीं खवळेल वीरांच्या मनाचा मोकळा दर्या
गिळायातें अविधातें मिळाया मुक्तता आर्या

खडा हा द्यावया धडका कडा हा कोट छातीचा
हृदीं अंगार सूडाचा जळे, ना लेश भीतीचा
करीं तळपेल वीरांच्या जयीं ती तीक्ष्ण तरवार,
शिरें कैशी धडावरती तयांच्या सांग ठरणार

अता संभाळ केव्हांचा निजेला जागला सिंह
कधींचा तो भुकेजला – पळा सोडोनि ही शीव
तयाची गर्जना येता, कुठें दडतील मृग भित्रे
रवीतें पाहुनी पळती जशी मेघांत नक्षत्रें

धरित्री खावया उठली उभा मार्तंड जाळाया
दडा जा सागराखालीं – फुका विस्तारता माया
कधीं हा डाग दास्याचा धुवोनी साफ जाअील!
अरींच्या रक्तरंगांनी कधीं हा देश न्हाअील!

★ ★ ★

# महोत्सव

दे आलिंगन मज परवशतें
जावोत अशी ही वर्षशतें

स्वतंत्रतेचें नको मज जिणें
हवी तुझीं तीं गोड चुंबनें
मगरमिठींत सुखानें मरणें
खदखदां हसले कलेवर तें

हृदयाचे मृदु आंदोलन तें
सिंव्हासन असलें डळमळतें
आवडेल आमुच्या राणीतें
स्नेहाविण ज्योत अुभी जळते

काळरात ही आनंदाची
दीपमाळ तुझिया विभवाची
तयारीच कीं महोत्सवाची
आलें हे हृदयाला भरतें

डोळेभेट अशीच घडूं दे
गाढाश्लेषीं मला रमूं दे
नभोमंडळी नाद घुमूं दे
आमरण तुझी गाता विरूदे

# रणरमणी

रणरंग चला खेळू मिळुनी
मी रणरमणी तूं वीरमणी
विरहाकुल या वसंतागमीं
खेळायातें रंगपंचमी
तृषार्त कधिची तळमळतें मी
रे आतुरलें पाणिग्रहणीं
पिचकारीचा करिशिल मारा
भिजविल तनु ही त्या कनुधारा
मी न मुळीं सुकुमार कुमारी
लवतें न कधीं पातें भिउनी
थरथरुं दे हा अंतरगाभा
रणविकासिनी लाशा शोभा
रंगसभा थाटवूं वल्लभा
करूं संगर रंगरसीं भरूनी
दिशादिशांतुनि झडति दुंदुभी
नवपुलकांची सेनाहि उभी
राहू कुठवर घननीळ नभीं
विजली न जलीं विझली अजुनी
कवटाळुनिया सदा कटीला
मी विटलें या राजवटीला
ऊठ किशोरा बांध मुठीला
सुखसार नया निद्रामरणीं

# चलो दिल्ली!!

दूर दूर त्या तिथें-
महानदापलीकडे
जंगलापल्याड उंच डोंगरापलीकडें
सस्य श्यामला वरदा
मातृभूमि मंगला
वाढलों जिच्या कुशींत
अंकावर खेळलों
मायेचें स्तन्य पिउनि
उत्संगी लोळलों
जाऊं या तिच्याकडे
चला पुढें चला पुढें ! !

तळमळतें रक्त तिथें
सळसळतें रक्त इथें
रक्त देत आवाहन
घ्यायातें रक्तभेट
त्वरा करा चला उठा!
मुळीं न राहिला अवधि.
धरा करांत चापबाण
स्वातंत्र्याचें निशाण.
फोडुनिया अरिसेना
जाऊंया रुधिरपथें
करूंया बलिदान प्राण
दैवजरी वांछिते
चला तिथें चला तिथें

ह५००

# जयहिंद जयहिंद

LIBRARY.

'जयहिंद जयहिंद'
गाती दिशा धुंद
आली सारंगाची साद
अुठले तीरावर पडसाद
नाविकास दे सैनिक साथ।
सागर भूमीचे संवाद
जयहिंद जयहिंद

अुचंबळे दर्यातिल पाणी
बंधमुक्तिची सागर गाणी
मंत्रसिद्ध ती सुभाष वाणी
होवो क्रांती जिंदाबाद
जयहिंद जयहिंद

स्वतंत्रतेचे वाहत वारे
फुलवी हृदयांतील निखारे
भूमिजलांतरि या सहकारें
पंचभुतांचा तांडवनाद
जयहिंद जयहिंद

मुखांमुखांतुनि अेक घोषणा
मनांमनांतुनि अेक प्रेरणा
अभेदहिंदी अेक गर्जना
होवो भारत भू आझाद
जयहिंद जयहिंद

# रे हिंदयुवका ये पुढे

रे हिंदयुवका! ये पुढे, चल ये पुढे चल ये पुढे
नव हिंदवी सेनाशतें बघ चालली विजयाकडे
ये स्वर्ग हातीं आपुल्या पडला जरी रणिं देह ही
जिंकिता भोगावया ही सापडे तुजला मही
सांगते गीता तुझी तुज शस्त्र घे करि संगरा
अभिवंदना करि वंदुनी यदुनंदना योगेश्वरा
घनगर्जती तोफांतुनी चेतावणीचे चौघडे
धरी धीरता, वरिवीरता, रणचातुरी चल ये पुढे
जलि जिंकिलें, स्थलि जिंकिलें, युवका तुवां अपुल्यावलें
तव साहसातें भाळुनी गतभाग्य तुजसी लाभलें
चल टाक पाउल तें पुढें, स्फुरुं दे तुझे बाहू जरा
जिंकुं ये रणविक्रमें या–विश्वव्यापक संगरा
मदधुंद साधनअंध या अधमाधमा गरिमा चढे
अरिसिद्धिही उधळावया चल ये पुढे, चल ये पुढे
अजुनी न सरली ही निशा काळोख भरला अन्तरों
तेजाळल्या नुकत्या कुठे क्षितिजीं दिशांच्या झालरी
रणगीत विजयाचें तसें अडले पहा ओठावरी
भरले न अजुनी सूर ही निःशब्द जयनादांतरी
बांधशी अरुणा कधीं रविस्वागताचें तोरण
ये भारतीं स्वातंत्र्यभानू द्यावयातें दर्शन
रणरंगणीं तरुणा उडी तूं घेतली जरि या पुढें
चाललो निःशंक आम्ही आपुल्या विजयाकडे

क्र. ५००
L. B. DIXIT LIBRARY NAGPUR

# आम्ही लावले दिवे !

आली आली आज दिवाळी—मंगलता मालवे
ओंवाळाया स्वत: भोवतीं आम्हीं लावले दिवे
अवसेचा अंधार माजला चम्‌चम्‌ती काजवे
रात्रीचाही दिवस कराया आम्हीं लावले दिवे
आनंदी आनंद जाहला मावळतां हा रवी
काळोखांतच विरली सारी तेजाची थोरवी
रातकाजळी दिसे न कोणी माजवितां अंधेर
पळापळाला दिसे वाढता अंधाराचा घेर
समतेचें साम्राज्य (!) भुतांचे अनंत चालू थेर
दिला घेतला कुणी कुणाला प्रीतीचा आहेर
मनांतलेही काळेंबेरें येतां जरि बाहेर
काळेंगोरें कुठें वेगळें अेकच तें माहेर
विभूतींत झांकला पेटता सूडाचा अंगार
दिनजनाच्या जळत्या आशा विझवी किमयागार
वितंड्वादी अुडे हवाअी—रोषणी नि भुअिनळे
कळूनिही नाकळे काय तें पायाखालीं जळे
अस्तनींतले किती निखारे फुलवूं रातोरात
पराजितांच्या अंत्यचितांची खुलते जळती साथ
अशा दिवाळित दिवाभितांना मिळे मोकळें रान
परमुंडीपर करि पांडेपण खादीचा सैतान
चरख्यावरती सुत वळोनी अलक्ष केल्या वाती
अंधभक्त स्नेहांत भिजवुनी दिल्या नरोटचा हाती
स्नेहांकित या दुबळ्या ज्योती विझतिल वाऱ्यासवें
गर्जुनि सांगूं अखिल जगाला आम्ही लावले दिवे

# वावरात घसला चोर

लक्षी झाली जय भाओ हो वावरात घसला चोर
खाअुन्शनि दाने संमदे टाकिलं पेर सामोर
मुखत्यार बनोनी आला घेतला सर्व अखत्यार
बंगाळ दारुचा घोट
आम्हास्नि पाजला फुकट
पर संकट पडलं बिकट
धुंदींत अिसरलो सारं,—वावरात घसला चोर

तोडला खुटीचा पैका । धरुनीया बळजबरीनं
माय बाप आयाबहिणी । बाटविल्या सैतानानं
अिलुसंही ठेवलं नाहीं । धड मिळे न खाया अन्न
आयत्या पिठावर नाग
येअुन्शानि बसला आज
गरिबावर देअुनि बोज
मारुनी करा त्या ठार, वावरात घसला चोर

तोडुनी जिवाचे लचके । गाओीचें मांस खाणार
ओढून घास ओठाचा । आपुलं पोट भरणार
पाठीवर खाअुनि लाथा । नामर्द काय बनणार ?
कलिजात पेटला भडका
गोऱ्यांना लाअू चटका
मनाची भरली घटका
आगींत जाळूं शिर्जोर—वावरांत घसला चोर

घरमालक आमुचे आम्ही । तूं कोण आंत घुसणार ?
घे डेरा डंडा अपुला । पळ अता बऱ्या बोलानं
दाअू तुज पानी अमचं । नाहींतर बंडी हान.
वहु देश आमचा छळला
छायेने धर्महि मळला
वैमान हेतु तव कळला
भुलविण्यास पोरं सोर—वावरांत घसला चोर.

सामर्थ्य न पायीं भाओी । अकलेचा खंदक मोठा
अडविण्या चहूंबाजूंनी । रोखुनशनि धरल्या वाटा
नासधूस केली फस्त । लुटुनिया गांवच्या हाटा
भाओी हो आळसा सोडा
पाप्याचे मुडदे गाडा
फास हा गळ्याचा तोडा
दाअुनी तेज हत्यार—वावरांत घसला चोर

★
★ ★

# हे नाथ

हे नाथ! जगतात! प्रणिपात घे हा
सुजल सुफल करि भारत
आर्य धैर्यशालि अजित
हिंदध्वज गर्गनि सतत
विहरुं दे, वहरुं दे, बंधमुक्त देहा
तेजोनिधि ब्रम्हवृंद
क्षात्रवीर समरधुंद
धनिधवणिक धर्ममुग्ध
शापवाणि चापपाणि गाजवी प्रभावा
धेनु विपुल दुग्धमया
भीमकाय चपल हया
वृषभ सबल कृषिकार्या
वीरमणी, कुलरमणी भूपवोत गेहा
हो प्रसन्न रणचंडि
विजयतेज ते त्रिखंडि
गुणमंडित रामदंडि
दंडनीति, देशप्रीति, शक्ति युक्ति स्नेहा
कर्मभूमि धर्मभूमि
पुण्यभूमि रामभूमि
विश्ववंद्य हिंदभूमि
मातृभू, पितृभू हीच होय आम्हा

★

★ ★

# हांक

सोडि बन्धो मोहनिद्रा संपली बघ शर्वरी
अूठ आतां सत्वरी
कुठवरी ह्या भुजगपाशी गुंतुनिया राहसी
सोडि रे ती मञुशी
बघ सभोतीं पसरली ही अरुणदीप्तीशांतिची
सूचना बघ क्रांतिची
विसर आतां रम्य मोहक पुष्पशय्या साजिरी
अूठ आता सत्वरी
कडकडे ही कृष्णमेघीं झाकली सौदामिनी
दास्यवृत्ती नाशिनी
रे नको तै खगगणांचे सुप्रभातीं कूजन
परि असींचे खंजन
झिरपुं देअी रक्तबिंदु जीव तरुपर्णांतुनी
समरदेवी पूजनीं
जखडलेली आत्यमाता मुक्त होण्या हंबरे
प्राग होतो घाबरे
पूस आसूं आत्यपुत्रा बंधनें तोडून ती
देअुनी प्राणाहुती
रुधिर सिंचन स्वस्तिकातें रुडकमलें जोडुनी
काढ ती समरांगणी
खचित आणूं विजयघोषें दुंदुभी नादावरी
स्वातंत्र्यदेवी मंदिरी

# जय जय भारत देश

रामराज्य नांदलें भूवरीं अवतरला परमेश
सुजल सुफल आसेतु हिमाचल अमुचा भारतदेश
होम हवन, नित, वेदपठण, आश्रमी गुंजल्या श्रृतीस्मृती,
करिति अैकुनी मंत्रघोष तो गंगायमुना सरस्वती
गो ब्राह्मण प्रतिपाल, धनुर्धर क्षात्रवीरवर धन्मरणी
वैश्यातें व्यापार, धर्म अधिकार ब्राह्मणा भूदेवा
समाजसुख साधिती शूद्रही संतत करुनी जनसेवा
स्वातंत्र्याची अखंड ज्योती
हृदयीं हृदयीं तेवत होती
दीपमहोत्सव घराघरांतुनि दास्यतमाची करिती होळी
स्वातंत्र्याचा वसंत फुलता, कोटिकोटिकंठातिलवाणी
हृदयवीणेच्या छेडुनि तारा नाचति छंदें गाती गाणी
अेकत्वाचें प्रतिक सारें
बंधुत्वाचें वाहत वारे
दिशादिशांतुनि घोष निनादित
'अखंड भारत अखंड भारत'
हाच दिव्य संदेश—
आसिंधुसिंधुपर्यंत अेक हा अमुचा भारतदेश

★
★ ★

# नौखालीतील जीवन महोत्सव

येऔ स्वातंत्र्यदेवते, घ्यावें आमुचे वंदन
आज झालो गे स्वतंत्र, आम्ही जरी अचेतन
पहा निखळले चिरे, आणि कळस ढळला
मूर्ति फोडिली सांधाया, सभासंडप जाळला
याच भग्नमंदिरांत करूं तुझा मानपान
परी अेकदां न्याहाळी, कसें सजलें स्मशान
अमावासेचा मुहूर्त, तुवां साधलास बाअी
काळरात्रीं स्वागताची केली काळी कारवाअी

★ ★ ★

आली स्वातंत्र्यदेवता खरे आम्ही भाग्यवंत
भारताच्या वैराणांत चला फुलवूं वसंत
हांस हांस पाहोनिया रक्तवसंताची शोभा
अडखळत बोलती लांब हांसडल्या जिभा
आला मृत्यूला बहर पहा जोहाराच्या चिता
अहिंसेनें मेलेल्यांनो! काय मरणाला भिता!
नाळवारांत ओवल्या स्तनशकलांच्या माळा
बालरक्तानें रंगल्या, घालायातें तुझ्या गळा
पंचप्राणाचे स्तबक, हुंदक्यांची हारावली
गेली पार कोमेजुनी हातसुतांत ओवली
मिटलेल्या नजरांचे आज सुकले गजरे
साज कोवळ्या फुलांचा, मेले गुलाब लाजरे

★ ★ ★

पापण्यांच्या कोटरांत, कशी थिजली पांखरे
टोचावया कावळ्यांना मानवी ही गुरेढोरे
खुपतील तुझ्या पायीं भग्नसौभाग्याची लेणीं
भंगलेल्या मस्तकानें पहा विस्कटली वेणी
दात दिसती बाहेर ओठ अजुनी हांसरे
शील जाळोनी राखिले पायीं राखेचे ढिगारे
यौवनाची मखमल — झाले कपाळ पांढरे
तुझ्या पायघडीसाठीं. अंथरिली कलेवरे
फुटलेल्या बांगड्यांचे मनगटावरी चरे
आटले हे वाहतांना, रक्त कुंकवाचे झरे
नीट दुभंगला देह, तरी शकलांचे हात
कवळिती अेकामेका, व्हाया अेक स्मशानांत

★ ★ ★

शकलांची आलिंगनें — भयाभीत भांबावली
दया याचिता काळाची — किती तुटल्या ओंजळी
स्थिरावलेला विकास मेंदी माखली पावलें
ठायीं ठायीं थारोळ्यांत — कोळपलेली कमळें
चुंबी पाजतांना तान्हें गालीं लागलें काजळ
मुके तुटताच पान्हा अुरी दुधाचें ओघळ
रक्तदूध मिसळलें — मिळे नियतीच्या लेखा
आस विरे आसवांत मुकल्या या गतिरेखा
अुरीं पोटीं अुठलेलें क्रूर रक्ताळले वळ
ठेचलेले आवयव ठोकरांची रखंदळ

अुभ्या आडव्या जखमा — अंगीं गुंफियले घाव
खोल घावांच्या जाळ्यांत — नाहीं अडकले जीव

★ ★ ★

आता अुठा मेलेल्यांनो, व्हाया मुक्तीनें बेहोष
डोळे लावोनिया करा स्वातंत्र्याचा जयघोष
झाले तुकडे देशाचे — नाहीं परी अविभक्त
आज आम्ही मिळविले — नाहीं सांडविले रक्त
अहोरुप अहो ध्वनी स्वातंत्र्याचें सुस्वागत
मिळे स्वर्गंत स्वातंत्र्य आज आम्हा स्मशानांत
चिरडल्या भावनांनी पूजा बांधू निर्माल्यात
स्वातंत्र्याचा हा सोहोळा — भुकेल्यांच्या कल्लोळांत

★ ★ ★

S. DIXIT LIBRARY, NAGPUR.
Purchased on 24-2-53...
Cl. No. ............
Accession no 2352/195357

# सुजल सुफल हा देश आपुला

रे मूढांनो ! कंगालांनो !
कां ओरडता ? कां विव्हळता ?
भिडूं द्या पाठीस पोट
घट्ट मिटा ते ओठ
वाहुं द्या अश्रूंचाही लोट
तेंच पिऊनि पाणी
गा स्वागत गाणीं
नका भ्रष्टवूं युद्ध शांतता
या दुष्काळीं किंकाळ्यांनी

ही श्रमले, ते दमले
तुमच्या साठीच ना आजवर ?
कशास मग बरळतां !
' हें आमुचें घर हें आमुचें घर '
कृतघ्न तुम्ही कंगालांनो
' भक्षाया कां करिती रक्षण ' !
विचारतां कां ?
बरे नव्हे हें असलें लक्षण !
त्याग केवढा ! जरी जाहला तुम्ही भुकेकंगाल
मोक्षाचे तो धडे गिरवितो मरणोन्मुख बंगाल
पहा तयाच्या कडे
दावुनिया नरडे
मुकी मेंढरें बना
नका विसरूं या दास्यखुणा

क्रां. ५००



सुजल सुफलही भारतभूमी
त्यागभूमि तूमची
जगाची भोगभूमि साची
गजराजाच्या पायाखालीं
किती चिरडल्या कीटांची
कशास पर्वा करितिल कोणी
असल्या दुबळ्या भाग्याची
हवें कशाला अन्न ! जगाया !
जगणें कसलें, नित्य मराया
पोटांची खळगीच भराया
आम्ही जगतो, आम्ही जगतो, कशास हा अभिमान ?
अनंत आशांच्याच चितांचें
अेकच अेक स्मशान
तेंच खरें हें अमुचें भारत
राहिल जीवन वृत्त
युगायुगांचें फळलें हें संचित

करूं स्मशानाची फाळणी
खूप माजवूं रणें
गुलामदेहातें या जाळणें कीं गाडणे
जाळुनियां गाडणें, हाच तो मान्य तशांत वरा
जळोत हिंदु तरी तयांच्या बांधूंया कबरा
अखंड भारत हा जितांचा नि गांडूळांचा
हक्क न त्यावरती काय मग जिवंत प्रेतांचा
अखंड भारत हा असे तो जिवंत लोकांना
फिकिर ना आम्हा करूं द्या त्या पाकिस्ताना

वाढवीत सीमा; तयांना अेकच हा छंद
'युनो'त मुरलेला काश्मिरी चाखित गुलकंद
समावीच दिसुं द्या भारतीं या जिकडे तिकडे
पुरे पांच हातीं करावे मोजुनिया तुकडे

जगाचीं करावयास रचना
जमले मत्तमतंगज ते
पुच्छ हालवोनी, श्वान हें मवेच लुडबुडतें
दिली तया वचनें, तुम्हाही मिळेल रे जागा
गाढव बांधाया, देअूं घोड्यांच्या पागा
चघळाया हाडें, वाळला कधि भाकरतुकडा
रणधुमाळींत परि तूं, मागें लाअूं नको लकडा

★ ★ ★

हांसा हासा खुशाल हासा
क्षण हा भाग्याचा आला

रणचंडीच्या मुखांतुनी या हास्याच्या अुठती ज्वाला
रुंडमाळ ती कंठामधली, फुलली दावित दंतकळचा
अेकदांच हासल्या विवश त्या विझतां नेत्रांच्या दिवल्या
अुघडुनि या दाढा कराला काळ पहा आला
व्हा तयार सारे तयाच्या भव्य स्वागताला
स्वागतशील तुम्ही, विसरणें योग्य न अितिहासा
हसतें जग तुम्हा, तुम्हीही खुशाल त्या हासा
अेकच भारत भू जगाच्या पराधीनतेला
त्या अधमांगानीं फाडिला जरतारी शेला
अंग अंग दिसते फेडिता हिरवी काचोळी
झांकाया दुबळी लाज घे पदराची जाळी

हिमालय थिजला — थिजला धीराचा
गंगासिंधूतुनी वाहतो प्रवाह रुधिराचा
सहस्र किरणांचा कसा तो लपला रविगोल
दुबळ्या जीवांचा ऐकुनी कृतांत कल्लोल
फुलें मुलें सुकली लतिका तरू पार वठले
छायावैभव तें अुपवनीं चोंहिकडे झुकले
प्रलयाचें वारें, लीला रम्य कृतान्ताची
मोहर मरणाचा शोभा रक्तवसंताची
कळपाकळपानें, चालले प्राणहंस वरती
नयनांचे रावे बिचारे ठायिच फडफडती
वठल्या तरुवरती मोहळें असंख्य भरलेली
बिंदु बिंदु गळतो काळजें कवळी थबथबली
सुकलेल्या रानीं वाहती अश्रूंचे पाट
टवटवल्या कलिका, बघाया मरणाचा थाट

★ ★ ★

राजनिष्ठ तूं गुलाम
दानशूर हो खरा
सोसणे न भोगणेच दिव्य ही परंपरा
लुटलेच अगोदर गेह
कारणीं लागुंद्या देह
पोटास लागुंद्या कळा
व्याकुळ होअुनिया हळहळा
मरणाचा फुलला मळा
अुन्ह रक्त प्यावया, चराया कोल्हीं अन् कावळे
सरणावरती दिसो न तेही हाडांचे सांपळे

घोड्यांच्या टापांनीं उडती कवट्यांचे चेंडू
नका मानवापरी भुतांनो आपसांत भांडू
मरणाच्या दारांत कशाला पेज तांदळाची
मुखांत पडूं द्या पवित्र गंगा जगदोद्धाराची
भुके राहूनी लढूं चला सुजल सुफल हा देश आपुला

★
★ ★

# लाहोरचें बलिदान

महन्मंगले आर्यमाते तुझे पाश तोडावया संगरी धावले
रणामाजी देउनी आत्माहुती ते पवाडे यशाचे तुझ्या गायिले
न झालीं मनें तृप्त रोधून पाही कधीं मुक्त होणार ही माउली
वरी अंबरी राहती ते हुतात्मे लकाकोनी देती जनां धैर्य ही
फांसावरी खड्गधारी वरी वा चढोनी मरूं स्वर्ग हातीं धरूं
असे मार्ग कित्येक काढूं मराया लढाया तरीं शस्त्र तें सावरूं
कडाडे तडीत् मेदिनी हृद्‌वितानी जाळावया दास्यता कानन
हुंकार कानी पडे प्राणहंता अतां जागला क्रूर पंचानन
किती बांधूनि अश्रु मुंडावळ्या त्या तुझे लाडके पुत्र जाती वरी
घोटाळतो जीव खाली वरी गे पुन्हा जन्म घेण्यास या भूवरीं
धडावेगळें शीर झालें तरीहि तुझें नांव आओ मुखीं घोळते
निजूं दे पुन्हा जन्मूनी हिंदुमाते तुझ्या दिव्य अंकावरी प्रार्थिते
असे शेंकडो भक्त सिंहापरी वीर ते जन्म घेतील या भारतीं
तशा जीव ज्योती किती पाजळोनी करूं आर्यमातेस पंचारती.